## नि.दि.मु.क्र.१२/२०१९ मधील निशाणी क्र. ७३ वरील आदेश

## (CNRNO.MHSI090000522019)

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादींचा जबाब वाचला. उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०२. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी क्र.०२ यांनी मयत वादी क्र.०१ भिकाजी यांच्या वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास विनंती केलेली आहे. दप्तरी दाखल असलेल्या मृत्यूपत्रान्वये वादी क्र.०१ भिकाजी सुर्याजी आयरे हे दि.२८/०४/२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तूत अर्ज हा मुदतीत असल्याने सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. दाव्याचे स्वरुप बघता दाव्याचे कारण अबाधित राहत असल्याने व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २२ ची व्याप्ती लक्षात घेता अर्ज मंजूर करणे न्यायसंगत वाटते. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

### – आदेश –

०१. निशाणी क्र. ७३ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी क्र.०१ भिकाजी यांच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करुन दुरूस्ती प्रत पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी दाखल करावी.

०३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2022.07.07 11:19:01 +0530

स्थळ : देवगड (एस.बी.वाळके)

दिनांक : ०६/०७/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.